सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई**. ४०० ००१. **दुरध्वनी क्र**.२२६२०२३१/३२
Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

क्रमांक:-डिओओ-२०२५/तीन/1527 दिनांक-24 SEP 2025

कला संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून शासकीय रेखाकला परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संदेश-

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने दि.२४ व २५ सप्टेंबर,२०२५ रोजी एलिमेंटरी व दि.२६ व २७ सप्टेंबर,२०२५ रोजी इंटरमिजिएट या शासकीय रेखाकला परीक्षा राज्यभरात आयोजित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील कला क्षेत्रातील सर्वात महत्त्वपूर्ण अशा एलिमेंटरी (Elementary) आणि इंटरमीजिएट (Intermediate) परीक्षेसाठी तुम्हा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

तुम्ही सर्वांनी या परीक्षांसाठी घेतलेली मेहनत, सराव आणि कलेप्रती असलेली तुमची निष्ठा प्रशंसनीय आहे. ही परीक्षा फक्त तुमच्या चित्रकलेच्या कौशल्याचीच नव्हे, तर तुमच्या कल्पनाशक्तीची, निरीक्षणशक्तीची आणि एकाग्रतेचीही कसोटी घेणारी आहे. तुम्ही शांत मनाने आणि आत्मविश्वासाने या परीक्षेला सामोरे जा. तुमच्या हातून उतरणाऱ्या प्रत्येक रेषेत, प्रत्येक रंगात तुमची कला आणि सर्जनशीलता नक्कीच दिसेल. **तुम्हां सर्वांनाच सुयश चिंतितो!**

**पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा संदेश-**

राज्यातील काही भागांमध्ये अतिवृष्टीच्या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या पूर परिस्थितीची आम्हाला कल्पना आहे. तुमच्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक प्रशासनाने/जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने जाहीर केलेल्या सुट्टीमुळे तुम्हाला परीक्षेला सामोरे जाण्यात अडचणी येऊ शकतात, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे, ज्या जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थितीमुळे सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा स्वतंत्रपणे आणि योग्य वेळी पुन्हा आयोजित केली जाईल. तुम्ही कोणत्याही प्रकारची चिंता करू नये. ही परिस्थिती जरी कठीण असली, तरी तुमची मेहनत वाया जाणार नाही.

तुम्ही सर्वांनी धीर धरावा. आम्ही तुमच्या सोबत आहोत आणि तुमच्या हिताची काळजी घेण्यासाठी कटिबद्ध आहोत. **तुमच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!**

स्नेहादराने,

आपला स्नेहांकित,

(डॉ. किशोर दि. इंगळे)
कला संचालक,
कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य
मुंबई